# भारतीय मुसलमान

अनुवाद

प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण

# भारतीय मुसलमान


अनुवादक

**प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण**



**निर्मिती प्रकाशन, कोल्हापूर**

## अनुक्रम

**भूमिका / १३**

**भारतीय मुसलमान : वर्तमान आणि भविष्य / ४१**

असगर वजाहत

**एकविसावे शतक आणि इस्लाम / ५१**

असगर अली इंजिनियर

**भारतीय मुसलमान / ६४**

रफीक जकेरिया

**भारतीय मुस्लीम मन / ८०**

अब्दुल बिस्मिल्लाह

**भारतीय मुसलमान : दशा आणि दिशा / ८५**

रिजवान कैसर

**भारतीय मुसलमान : सामाजिक आणि आर्थिक स्थिती / ९५**

नेसार अहमद

**मुस्लीम महिला आणि मागासलेपण / १०९**

जोया हसन

**भारतीय मुस्लीम समाज : कमतरता व उपाय / ११३**

इम्तियाज अहमद

# तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने...

'भारतीय मुसलमान' या ग्रंथाची तिसरी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे याचे मनस्वी समाधान आहे.

साधारणपणे आठरा वर्षापूर्वी 'हंस' या हिंदीतील नावाजलेल्या मासिकाचा अंक हाती आला. अंकाचे स्वरुप, मांडणी, मान्यवरांचे विचार व समकालीन मौलिकता सर्वच लक्षणीय होते. अंक वाचल्यानंतर असे वाटले की, सदरच्या अंकातील विचार मराठी वाचकांसाठी उपलब्ध करायला हवेत. त्या दृष्टीने 'हंस' चे तत्कालीन संपादक डॉ. राजेंद्र यादव यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी 'हंस' चे लेख अनुवाद करण्यासाठी सहर्ष परवानगी दिली. त्या आधारे मूळ अंकातील पंधरा लेख अनुवादित स्वरुपात प्रकाशित केले. या पुस्तकाचा हेतु मुस्लिम मान्यवरांचे विचार महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील विचारवंत, संशोधक, समाजशास्त्रीय, राजकीय नेते आदिपर्यंत पोहचविणे हा होता. त्यामुळे अनेकांना पुस्तके पाठविली. कार्यक्रमामध्ये वाटप करण्यात आले. समाधान याचे आहे की अनेकांनी या उपक्रमाचे स्वागत केले. कौतुक केले. 'भारतीय मुसलमान' ची पहिली आवृत्ती निर्मिती प्रकाशन संस्थेने व दुसरी आवृत्ती 'अक्षरदालन' ने प्रकाशित केली. तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने निर्मिती प्रकाशन संस्थेचे सहकार्य होत आहे.

## मनोगत...

एकविसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकामध्ये जगभरातील मुस्लीम समाज अस्वस्थता आणि बेचैनी अनुभवतो आहे. भारत ही याला अपवाद नाही. इस्लामी धर्मतत्त्वांची आग्रही मांडणी करताना विशिष्ट धर्मवादी संघटना जगभर दहशतवादी कृत्य करीत आहेत. जगाला अहिंसेचा संदेश देणाऱ्या महात्मा गांधीच्या भारतामध्ये अशी वृत्ती बळावणार नाही अशी ठाम धारणा होती. पण दुर्दैवाने काही वाट चुकलेले तरुण कट्टर धार्मिक प्रलोभनाना बळी पडल्याचे प्रथमदर्शनी जाणवत आहे. ही खूपच गंभीर बाब आहे. अशा गोष्टीतील सहभागामुळे संपूर्ण मुस्लीम समाज आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न होत आहे. भारतातही विशिष्ट विचारसरणीच्या संघटना व व्यक्ती या संदर्भात जाहीर वक्तव्य करून अस्थैर्य निर्माण करीत आहेत. अशा वेळी समाज व व्यक्ती यांना समजून घेणे व देणे जरुरी वाटू लागले होते. हा विचार मनात प्रबळ होत असताना हिंदी मासिक 'हंस' ने 'भारतीय मुसलमान : वर्तमान आणि भविष्य' हा विशेषांक प्रसिद्ध केल्याचे वाचनात आले. अंक उपलब्ध केल्यानंतर त्यातील मान्यवरांचे लेख, वैचारिक मांडणी व निष्कर्ष मराठी वाचकांपर्यंत पोहोचवायला हवेत असे वाटले. याच दरम्यान शिवाजी विद्यापीठाने 'अनुवादा'चा कोर्स सुरू केला होता. एका अभ्यास पत्रिकेमध्ये अनुवाद करण्यासाठी एखाद्या पुस्तकांची निवड करायची होती. मी या संधीचा फायदा घेऊन 'हंस' मधील निवडक लेख मराठीत प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला.



प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण
४३ सोनसावली, नर्मदा पार्क,
इंगवले कॉलनी, फुलेवाडी
कोल्हापूर-४१६०१०
मो. ९९६०९९५८५३

आज भारतीय मुस्लिमांविषयी वेगवेगळ्या पातळ्यांवरून मतांची मांडणी होत आहे. विशेषत: बिगर मुस्लीम विचारवंतांनी केलेली मांडणी धर्मभावनेच्या आजूबाजूला स्थिरावताना दिसते. अर्थात हे स्वाभाविक आहे. कारण ही बाब सहजपणे नजरेत येण्यासारखी आहे. परंतु मुस्लिमांच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक स्थितीविषयी सखोल चिंतन आढळून येत नाही. वरवरच्या साधनांचा आधार घेऊन निष्कर्ष काढण्याकडे बहुतांश विचारवंतांचा कल असतो. याचा परिणाम असा होतो की, मुस्लीम समाजाची वस्तुस्थिती व्यापक अशा पटलावर समोर येत नाही. दीर्घकाळ भारतीय जीवनाशी अभिन्न असणारा हा समाज इतर समाज समूहाच्या दृष्टीने काहीसा अनभिज्ञ, अनोळखी असा वाटतो. विशाल परिप्रेक्ष्य असणाऱ्या भारतासारख्या देशाच्या दृष्टीने ही बाब निश्चितपणे गौरवाची नाही.

ग्रंथ हवा असल्यास...
फोन/गुगल पे नंबर
९८२२४७२१०९

NIRMITI PRAKASHAN
+91 98224 72109
9822472109@okbizaxis
Scan & Pay

रु. ३००/-

निर्मिती प्रकाशन
८७३, क/२, सी वॉर्ड, सिध्दीश्री प्लाझा,
राजाराम रोड, कोल्हापूर - ४१६००२
मो. ९८९०५५४३४०, ९८२२४७२१०९

ISBN : 978-93-92922-33-6
978-93-92922-33-6
Nirmiti Prakashan